जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/३८९२ /२०२४
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :- १८/०३/२०२४

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.**

आदेश

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे पत्र क्र.४३७/६/१/ECI/PN/23/2024 DATE 16.03.2024 अन्वये १८ व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. आचारसंहीता दिनांक १६/०३/२०२४ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील. सदरच्या निवडणुका ह्या सुरळीतपणे व शांततेत पार पाडण्यासाठी पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखणे कामी सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व उपद्रव टाळण्यासाठी सर्व प्रकारची शस्त्रे व हत्यारे यांना जवळ बाळगून फिरणेस मनाई करणे अत्यंत जरुरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी प्रविण पवार, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, संपूर्ण पुणे शहरात **दिनांक १८/०३/२०२४ चे ००.०१ वा. पासून ते दिनांक ०६/०६/२०२४ रोजी २४.०० वा.पर्यंत** संपूर्ण मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खालील प्रमाणे आदेश देत आहे.

नमूद मुदतीत अधिकृत हत्यार परवान्यावरील कोणत्याही प्रकारची हत्यारे घेवून फिरणेस या आदेशान्वये मनाई करण्यात येत आहे. सदरचा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावित असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना (पोलीस दल, संरक्षण दल, तुरुंग विभाग, बॅक सुरक्षा विभाग व इतर केंद्रीय तसेच राज्य शासनाचे अधिकारी व कर्मचारी यांना) लागू राहणार नाही. ज्या परवाना धारकास रुढी प्रमाणे बंदुक डिस्प्ले करण्याचा अधिकार आहे त्यांना हा आदेश लागू राहणार नाही.

सदर आदेशाचा उल्लंघन करणारी व्यक्ती भा.द.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहिल.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज रोजी दि.१८/०३/२०२४ रोजी दिला आहे.

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- १८/०३/२०२४

पोलीस सह आयुक्त पुणे शहर

१७/३

(प्रविण पवार)
पोलीस सह आयुक्त,
**पुणे शहर**

Scanned with OKEN Scanner

**प्रत सविनय सादर :-**

१.मा.अतिरिक्त मुख्य सचिव, गृह (विशेष) मंत्रालय, म.रा. मुंबई
२.मा.पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई
३.मा.आयुक्त व अपर पोलीस महासंचालक, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा. मुंबई
४.मा.पोलीस आयुक्त व अपर पोलीस महासंचालक, पुणे शहर

**प्रत :- सस्नेह अग्रेसित :-**

६. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग
७. मा.आयुक्त म.न.पा.पुणे
८. मा.जिल्हा सत्र न्यायाधीश, पुणे
९. मा.जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी पुणे
१०. सर्व निवडणूक निर्णय अधिकारी (पुणे,बारामती,शिरुर)

**प्रत :-**

१. अपर पोलीस आयुक्त,पश्चिम,पूर्व, गुन्हे, प्रशासन, विभाग पुणे शहर
२. सर्व पोलीस उप आयुक्त, / सहाय्यक पोलीस आयुक्त / विधी अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
३. जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे. २/- या आदेशाची स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी करावी.
४. व्यवस्थापक येरवडा मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, पुणे. २/- या आदेशास प्रसिध्दी देण्याकरीता आणि कार्यालयाच्या भांडारामध्ये ठेवण्यासाठी प्रती पाठविण्यात आल्या आहेत.
५. पोलीस आयुक्तालयातील सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक व वाहतुक शाखेतील सर्व पोलीस निरीक्षक यांनी आपआपल्या हद्दीमध्ये या आदेशाची जास्तीत जास्त प्रसिध्दी होण्यासाठी ध्वनीक्षेपकाद्वारे किंवा अन्य मार्गाने प्रसिध्दी करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करावा.

Scanned with OKEN Scanner